पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- १६/०३/२०२१*

## गडचिरोली पोलीस दलाच्या पुढाकाराने दुर्गम भागातील आदिवासी युवक-युवती जगत आहेत स्वावलंबी जीवन

गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, नक्षलग्रस्त, अतिसंवेदनशिल व आदिवासी बहुल असून येथील आदिवासी युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी व ते आत्मनिर्भर व्हावेत या उद्देशाने मा. पोलीस अधीक्षक, श्री. अंकित गोयल सा. यांच्या मार्गदर्शनाखाली व संकल्पनेतुन गडचिरोली पोलीस दलाने **रोजगार मेळावा ॲप** तयार करुन आपल्या नावाची नोंद करण्यासाठी युवक-युवतींना आवाहन केले होते. यामध्ये ५,००० युवक-युवतींनी रोजगार मेळावा ॲपमध्ये आपल्या नावाची नोंद केली होती. याचाच एक भाग म्हणुन गडचिरोली पोलीस दल व प्रथम एज्युकेशन फाऊँडेशन, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने ऑटोमोबाईल व हॉस्पिटॅलिटीचे प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या युवकांसाठी पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील एकलव्य धाम येथे दिनांक ०१ फेब्रवारी २०२१ रोजी नियुक्ति व प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन राळेगाव, यवतमाळ,** यांचे मार्फत फेब्रुवारी २०२१ मध्ये हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण पुर्ण केलेल्या ७२ युवक-युवतींना मुलाखतीद्वारे निवड करुन मुंबई, गोवा, महाबळेश्वर, पुणे, नागपूर, लोणावळा अशा ठिकाणी ७,०००/- रुपये ते १०,०००/- रुपये वेतन निवास व जेवनाची मोफत सोय असलेल्या ठिकाणी व ऑटोमोबाईलचे प्रशिक्षण पुर्ण केलेल्या २३ युवकांना कर्नाटक, अहमदनगर, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी १२,०००/- रुपये वेतनावर नोकरीची संधी मिळवुन दिली आहे. आतापर्यंत एकुण १,४७४ युवक-युवतींना गडचिरोली पोलीस दलाचे वतीने रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे

मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा. यांनी सर्व रोजगार प्राप्त युवक-युवती तसेच रोजगार व प्रशिक्षण मिळवुन देण्यासाठी अथक परिश्रम घेत असलेल्या प्रथम एज्युकेशन फाऊँडेशन तसेच नागरी कृती शाखेच्या अधिकारी, अंमलदारांसोबत समन्वय ठेवुन अविरत काम करणाऱ्या गडचिरोली पोलीस दलातील सर्व अधिकारी व अंमलदार यांचे अभिनंदन केले आहे.


प्रथम अरोरा शिक्षण केंद्र